**प्रेस नोट** दिनांक - ३१/०८/२०२४

दिनांक ३०/०८/२०२४ रोजी सोशलमिडीयावर वायरल झालेल्या व्हीडीओमध्ये एका इसमाची दोन इसम झडती घेत असल्याचे व त्यांचे सोबत दोन इसम दिसत होते. व्हीडीयोबाबत शहानिशा केली असता व्हीडीयोमध्ये दिसणारे चार इसम हे पोलीस असून त्यांची नेमणूक खार पोलीस ठाणे, मुंबई येथे असल्याची खात्री झाली. प्रस्तुत प्रकरणी अधिक चौकशी केली असता खार पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांच्या पथकाने दिनांक ३०/०८/२०२४ रोजी प्रचलित कायदेशीर पध्दतीचा अवलंब न करता त्या इसमास ताब्यात घेतल्याने व अंगझडती घेतानाच्या त्यांच्या हालचाली संशयास्पद दिसून आल्याने नमुद पोलीसांविरुध्द निलंबनाची कारवाई करुन पुढील चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे.